



नवीन शैक्षणिक वर्ष सुरू; पालकांची निदर्शने » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



हॅरी ब्रूक इंग्लंडच्या कर्णधारपदी » पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, ८ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 215 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 8 April 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### सौदी अरेबियाचा भारताला दणका

नवी दिल्ली, दि. ७ : अमेरिकेतील डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने २ एप्रिलपासून नवे व्यापार कर लागू करण्याचा निर्णय घेतला आणि संपूर्ण जगभरात याचे परिणाम पाहायला मिळाले. अशामध्ये भारतालादेखील याचा फटका बसल्याचे समोर आले आहे. अशामध्ये आता सौदी अरेबियानेही मोठा निर्णय घेतला आहे. भारत आणि पाकिस्तानसह १४ देशांच्या तात्पुरत्या व्हिसावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये उमरा, व्यवसाय आणि कुटुंब व्हिसावर बंदी घालण्यात आली आहे. सौदी अरेबियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने हा निर्णय घेतला असल्याची माहिती समोर आली आहे. हे निर्बंध जूनपर्यंत कायम राहणार असून ज्यांच्याकडे उमरा व्हिसा आहे ते १३ एप्रिलपर्यंत सौदी अरेबियात प्रवेश करू शकतात. या वर्षीच्या हज यात्रेच्या आधी सौदी अरेबियाने हा मोठा निर्णय घेतला.

------------

### आसारामला पुन्हा अंतरिम जामीन

सूरत, दि. ७ : जोधपूर आश्रमात अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसारामला गुजरातनंतर आता राजस्थान उच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. न्यायालयाने त्याचा अंतरिम जामीन १ जुलैपर्यंत वाढवला आहे. उच्च न्यायालयाने आसारामला सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या अटींचे पालन करण्यास सांगितले आहे. सोमवारी न्यायमूर्ती दिनेश मेहता आणि न्यायमूर्ती विनीत कुमार यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. न्यायालयाने आसारामला ३० जूनपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केला तेव्हा त्याच्या वकिलांनी शेवटच्या दिवशी सुट्टी असल्याने १ जुलैपर्यंत जामीन देण्याची विनंती केली. आसाराम १४ जानेवारी ते ३१ मार्चपर्यंत अंतरिम जामिनावर होता. हा कालावधी संपल्यानंतर, १ एप्रिल रोजी आसारामने आत्मसमर्पण केले. त्याच रात्री त्याला एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि अजूनही तिथेच दाखल आहे.

-------------

### कुणाल कामराला पुन्हा दिलासा

नवी दिल्ली, दि. ७ : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात केलेल्या कथित आक्षेपार्ह टिप्पणीमुळे स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आला आहे. त्याच्याविरोधात मुंबईत तीन एफआयआर दाखल असून हे तिन्ही एफआयआर खार पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आले आहेत. याप्रकरणी कुणाल कामराने सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करताना त्याच्यावरील गुन्हे रद्द करण्याची मागणी केली आहे. माझ्या विरोधातील गुन्हे हे राजकीय भावनेने प्रेरित असल्याचे त्याने म्हटले आहे. अशातच आता कुणाल कामराला मद्रास उच्च न्यायालयाकडून पुन्हा एकदा दिलासा मिळाला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या कथित आक्षेपार्ह टिप्पणीमुळे मुंबई पोलिसांनी कुणाल कामराला चौकशीला उपस्थित राहण्यासाठी आतापर्यंत तीन समन्स पाठवले आहेत. मात्र कुणाल कामरा एकाही समन्सनंतर मुंबई पोलिसांसमोर हजर झाली नाही. काही दिवसांपूर्वीच त्याने मुंबई पोलिसांकडे व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे त्याचे म्हणणे नोंदवण्याची विनंती केली. मात्र मुंबई पोलिसांनी कुणाल कामराची ही विनंती फेटाळली होती. तर दुसरीकडे कुणाल कामराने मद्रास उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

### हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ९२,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ९४,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७८,३६५.७७↑ (३१.१६)
निफ्टी : २२,२३५.९० ↑ (८३.९५)

# व्यापार युद्ध पेटले!

## ट्रम्प यांची चीनला धमकी | अमेरिकेवर ३४ टक्के आकाराल तर चीनला १०० टक्के लावू!

**वॉशिंग्टन, दि. ७ : अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनला स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, चीन ने ८ एप्रिल २०२५ पर्यंत अमेरिकन निर्यातीवरील प्रत्युत्तरात्मक शुल्क मागे घेतले नाही, तर चीनमधून होणाऱ्या आयातीवर ५०% अतिरिक्त शुल्क लादले जाईल.**

ट्रुथ सोशलवरील एका पोस्टमध्ये ट्रम्प यांनी म्हटले, चीनने त्यांच्या दीर्घकालीन व्यापार गैरवापरांमुळे लादलेली ३४% वाढ मागे घेतली नाही, तर अमेरिका ९ एप्रिलपासून चीनवर ५०% अतिरिक्त शुल्क लादेल. तसेच, त्यांनी चीनसोबतच्या सर्व बैठका रद्द केल्या आहेत .

चीनने अमेरिकन आयातीवर ३४% अतिरिक्त शुल्क लादल्यानंतर ट्रम्प यांची ही प्रतिक्रिया आली आहे. २ एप्रिल २०२५ रोजी ट्रम्प यांनी चीनवर ३४% अतिरिक्त कर लादण्याची घोषणा केली होती, त्यामुळे एकूण आयात कर ५४% इतका झाला.

ट्रम्प यांनी यापूर्वीच चीनला अमेरिकेवर कर लादण्याविरोधात इशारा दिला होता. त्यांनी स्पष्ट केले की, जर चीनने हे कर मागे घेतले नाहीत, तर अमेरिकन प्रशासन भविष्यात अधिक शुल्क आकारण्यास मागेपुढे पाहणार नाही.

ट्रम्प यांच्या या घोषणेमुळे जागतिक अर्थव्यवस्थेतील तणाव वाढण्याची चिन्हे आहेत. त्यांच्या नव्या धोरणामुळे चीनसोबतचे व्यापार संबंध आणखी ताणले जाण्याची शक्यता आहे.

गेल्या आठवड्यात व्हाईट हाऊसने मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लागू केल्यानंतर चीनने अमेरिकेच्या या धोरणावर तीव्र टीका केली. चीनने अमेरिकेवर एकतर्फीवाद, संरक्षणवाद आणि आर्थिक गुंडगिरी केल्याचा आरोप केला. ट्रम्प यांच्या या धोरणाचा शेअर बाजारावरही परिणाम दिसून आला. सोमवारी डाऊ जोन्स इंडस्ट्रियल




सरासरी १२०० अंकांनी घसरला, तर एसपी ५०० मंदीच्या बाजारात प्रवेश करण्याच्या मार्गावर आहे. काही अर्थतज्ज्ञांनी यामुळे अमेरिकन व्यवसाय, ग्राहक आणि गुंतवणूकदारांसाठी आर्थिक अनिश्चितता वाढण्याचा इशारा दिला आहे. ट्रम्प यांनी फेडरल रिझर्व्हला व्याजदर कमी करण्याचे आवाहन केले आहे. मात्र, फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांनी इशारा दिला आहे की, नव्या शुल्कवाढीमुळे महागाई आणखी वाढू शकते आणि यावर कोणताही निर्णय घेण्यापूर्वी परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण केले जाईल.

ट्रम्प यांनी जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांच्याशीही व्यापार वाटाघाटी सुरू केल्या असून, त्यांनी जपानवरही शुल्कवाढीचे संकेत दिले आहेत. ट्रम्प यांनी दावा केला की, जपान अमेरिकेच्या गाड्या घेत नाही, मात्र अमेरिका त्यांच्या लाखो गाड्या आयात करते. इशिबा यांनी या धोरणावर चिंता व्यक्त करताना अमेरिकेच्या शुल्कवाढीमुळे जपानी गुंतवणुकीवर परिणाम होऊ शकतो, असे म्हटले आहे. ट्रम्प यांच्या नव्या व्यापार धोरणांमुळे जागतिक स्तरावर मोठे बदल होण्याची शक्यता आहे. चीनसोबत वाढत्या तणावामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम कसा होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# म्हादई प्रकरणी हवाई सर्वेक्षण करण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ७ :** म्हादई बचाव अभियान (एमबीए) संघटनेने राज्य सरकारकडे मागणी केली आहे की, कर्नाटक सरकारने गोवा सीमेजवळ कुणकुंभी येथे म्हादई नदीचे पाणी वळविण्यासाठी हाती घेतलेल्या कामांचे हवाई सर्वेक्षण करावे.

माजीमंत्री आणि एमबीएच्या संयोजक निर्मला सावंत यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत ही मागणी केली. कर्नाटक सरकारने अनिवार्य मंजुरी न घेता कामे सुरू केली असल्याचा आरोप करत त्यांनी सरकारकडे या प्रकरणाची सखोल तपासणी करण्याची मागणी केली. कर्नाटक सरकारने म्हादई नदीचे तीन किलोमीटरचे प्रोफाइल बदलले आहे. पाणी वळवण्याचा कोणताही प्रयत्न गोव्याच्या पर्यावरणीय समतोलासाठी घातक ठरू शकतो, असा सावंत यांनी इशारा दिला.

सावंत यांनी पुढे सांगितले की, सर्वोच्च न्यायालयात गोव्याचा खटला लढण्यासाठी दिल्लीतील एका अनुभवी वरिष्ठ वकिलाची नियुक्ती करावी आणि प्रकरणाच्या तातडीच्या सुनावणीसाठी आवश्यक पावले उचलावीत. संबंधित प्रकरण न्यायालयात पुढे ढकलले जात आहे, परंतु गोवा सरकार



दिल्लीतील म्हादईसंबंधी कायदेशीर पथकावर मोठ्या प्रमाणात निधी खर्च करत आहे. मात्र, ते राज्याच्या हितरक्षणासाठी गंभीरपणे प्रयत्नशील नाही, असा आरोप त्यांनी केला.

कुशावती, मीराबाग आणि साळ नदीवर बंधारे उभारण्याच्या सरकारच्या योजनांवरही सावंत यांनी टीका केली. गांजे नदीवर सहा मीटर उंचीचे बंधारे बांधल्यास बोंडला वन्यजीव अभयारण्याच्या परिसंस्थेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. जलसंपदा विभागाचे (डब्ल्यूआरडी) प्रमोद बदामी यांना विस्तार सेवा देण्याच्या निर्णयावर एमबीएने नाराजी व्यक्त केली. गोव्यात अनेक सक्षम अभियंते असतानाही सरकार कर्नाटकातील अभियंत्यांना प्राधान्य देत आहे. राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांमधून सक्षम अभियंते तयार होत नसतील, तर अशा संस्था बंद कराव्यात, असे सावंत यांनी ठामपणे सांगितले.

पर्यावरणतज्ज्ञ आणि एमबीएचे सचिव राजेंद्र केरकर यांनी सांगितले की, कर्नाटक सरकारने कळसा नाल्याचे वळविण्याचे काम पूर्ण केले आहे आणि आता भांडूरा नाल्यासाठी जमीन संपादनाची प्रक्रिया अनिवार्य मंजुरीशिवाय सुरू केली आहे. हा प्रकार गोव्याच्या जलस्रोतांवर प्रतिकूल परिणाम करणारा असून, राज्य सरकारने तत्काळ हस्तक्षेप करावा, अशी मागणी केरकर यांनी केली.

# दहावीच्या परीक्षेतही मुलींचीच बाजी

## यंदा ९५.३५ टक्के निकाल : गतवर्षाच्या निकालाच्या टक्केवारीत वाढ

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ७ :** गोवा शालान्त मंडळाने आयोजित केलेल्या १० वीच्या परीक्षेचा निकाल आज सोमवारी संध्याकाळी ५ वाजता जाहीर झाला. यंदा दहावीचा निकाल ९५.३५ टक्के लागला. यात मुलींचा निकाल ९५.७१ टक्के तर मुलांचा निकाल ९४.९८ टक्के लागला. यंदा १८ हजार ८३८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ९२८० या मुली तर ९५५८ हे मुलगे होते. यापैकी १७ हजार ९६१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. गोवा शालान्त मंडळाने १ मार्च २०२५ ते २१ मार्च २०२५ दरम्यान राज्यात दहावीची परीक्षा आयोजित केली. परीक्षेसाठी ३२ अधिक ४ (उर्दू माध्यम) परीक्षा केंद्रे बनविण्यात आली होती. परीक्षेनंतर केवळ १५ दिवसातच



### ठळक

- १८ हजार ८३८ विद्यार्थ्यांतून १७ हजार ९६१ विद्यार्थी उत्तीर्ण.
- ९२७० मुली तर ९५५७ मुलगे उत्तीर्ण.
- यंदा ४३ सरकारी विद्यालयांचा निकाल १०० टक्के.
- १२३ अनुदानित विद्यालयांचा निकालही १०० टक्के.
- निकालपत्र वितरणाची तारीख लवकरच जाहीर केली जाणार.

दहावीचा निकाल जाहीर करण्यात आला आहे.

गेल्या वर्षीचा विचार करता १० वीच्या परीक्षेत तब्बल १८९१४ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी सुमारे, १७४७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. एकूणच निकाल हा ९२.३८ टक्के लागला. निकालपत्र वितरणाची तारीक लवकरच जाहीर केली जाईल.


# भोम महामार्ग चौपदरीकरणाविरोधात संघर्षाची तयारी

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ७ :** केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी भोमा ते जुने गोवा या महामार्गाच्या चौपदरीकरणाची घोषणा करताच, स्थानिक रहिवाशांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. बायपासचा पर्याय न देता थेट महामार्ग रुंदीकरणाचा प्रस्ताव मांडण्यात आल्याने भोमकरांनी सरकारविरोधात मोठ्या लढ्याचा इशारा दिला आहे.

गावकरी महादेव मंदिरात एकत्र येऊन आपल्या गाव आणि मंदिर संस्कृतीचे रक्षण करण्याची शपथ घेतली. या विकास प्रकल्पामुळे केवळ घरांचेच नव्हे, तर अनेक धार्मिक वास्तूंचेही नुकसान होणार असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली आहे. स्थानिक नेते संजय नाईक यांनी प्रस्तावित उन्नत रस्ता आणि सेवा रस्ते यामुळे संपूर्ण गाव उद्ध्वस्त होईल, असा दावा केला.

नाईक यांनी भाजपवर तीव्र टीका



करत, हे रामराज्य आहे की रावणराज्य? असा सवाल उपस्थित केला. दिवंगत मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांनी बायपासचे आश्वासन दिले होते, मात्र सध्याच्या सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले, असा आरोप त्यांनी केला. त्यांनी मृत्यूपर्यंत संघर्ष करण्याची तयारी असल्याचेही स्पष्ट केले.

स्थानिक रहिवासी किशोर नाईक यांनी बायपासच्या मागणीवर भर दिला आणि महामार्गाच्या निधीतून बायपास उभारावा, अशी मागणी केली. ७३ वर्षीय पुटू गावडे यांनी मोठ्या रस्त्यामुळे पारंपरिक मिरवणुका, उत्सव आणि धार्मिक परंपरा धोक्यात येणार असल्याचे सांगितले.

स्वप्नेश नाईक यांनी सरकारवर धार्मिक भावनांचा गैरफायदा घेत असल्याचा आरोप करत, विकास म्हणजे आमची मंदिरे आणि संस्कृती नष्ट करणे असेल, तर त्याचा उपयोग काय? असा प्रश्न उपस्थित केला.

दरम्यान, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी राष्ट्रीय महामार्ग–७४८ वरील ७ किमी लांबीच्या चौपदरीकरणांसाठी १,०६०.२१ कोटी रुपये मंजूर करण्यात आल्याची घोषणा केली. हा महामार्ग कर्नाटकातील बेळगावजवळील राष्ट्रीय महामार्ग–४८ पासून गोव्यातील पणजीजवळील राष्ट्रीय महामार्ग–६६ पर्यंत १५३ किमी लांबीचा आहे. या प्रकल्पामुळे वाहतूक कोंडी कमी होईल आणि रस्ते सुरक्षिततेत सुधारणा होईल, असा दावा मुख्यमंत्री प्रमोद सावंत आणि राज्यसभा खासदार सदानंद शेट तानावडे यांनी केला आहे. मात्र, या विकासकामांमुळे भोमकरांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक अस्तित्वावर परिणाम होणार असल्याने स्थानिकांच्या संतप्त भावना कायम आहेत. प्रशासनाने यावर तोडगा काढावा, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे.

# भारताच्या व्यापार धोरणात बदल होण्याची शक्यता

**नवी दिल्ली, दि. ७ :**

भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील दीर्घकाळ प्रलंबित व्यापार कराराबाबत महत्त्वपूर्ण हालचाली होत असल्याची माहिती सूत्रानी दिली आहे . युरोपियन युनियनने भारताला कार आयातीवरील जादा शुल्क हटवण्याची मागणी केली असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार या प्रस्तावावर सकारात्मक विचार करत असल्याचे संकेत मिळाले आहेत.

सध्या भारतात कार आयातीवर १०० टक्क्यांहून अधिक शुल्क आकारले जाते. मात्र, हा दर टप्प्याटप्प्याने १० टक्क्यांपर्यंत कमी करण्यासाठी भारत तयारी दर्शवत असल्याची सुत्रांची माहिती आहे . तथापि, देशांतर्गत उद्योगांचे हित लक्षात घेऊन, कमीत कमी ३० टक्के शुल्क कायम ठेवण्याची आणि पुढील चार वर्षांसाठी



इलेक्ट्रिक वाहनांच्याआयात शुल्कात कोणताही बदल न करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

दरम्यान, अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने भारतासोबतच्या द्विपक्षीय व्यापार चर्चेत इलेक्ट्रिक वाहनांसह कारवरील आयात शुल्क हटवण्याची मागणी केली होती. त्यानंतर युरोपियन युनियननेही भारताकडे हीच मागणी करत दबाव वाढवला आहे, ज्यामुळे देशांतर्गत कार उत्पादकांवर मोठा प्रभाव पडण्याची शक्यता आहे.

शुल्क कपात ही युरोपियन कार उत्पादक कंपन्यांसाठी मोठी संधी ठरू शकते. फोक्सवॅगन , मर्सिडीज–बेंझ, बीएमडब्ल्यू यांसारख्या कंपन्यांना भारतीय बाजारपेठेत प्रवेश वाढवण्याचा मार्ग मोकळा होईल. तसेच, टेस्ला कंपनीलाही याचा मोठा फायदा होऊ शकतो, कारण कंपनी या वर्षी भारतात इलेक्ट्रिक वाहनांची विक्री सुरू करण्याच्या तयारीत आहे.

भारताच्या वाणिज्य मंत्रालयाने गेल्या आठवड्यात झालेल्या बैठकीत जड उद्योग मंत्रालय आणि वाहन उद्योग प्रतिनिधींना युरोपियन युनियन च्या मागण्या व भारताच्या भूमिकेबाबत माहिती दिली.

युरोपियन कमिशनने या बाबतीत अधिकृत प्रतिक्रिया देण्यास टाळाटाळ केली. मात्र, मार्चमध्ये झालेल्या चर्चेच्या तपशीलांची माहिती देताना, काही महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये,युरोपियन युनियन आणि भारताच्या धोरणांमध्ये भिन्नता आहे. यामुळे दोन्ही बाजूंमध्ये महत्त्वाकांक्षेच्या वेगवेगळ्या पातळ्या दिसून येतात, असेयुरोपियन युनियन चे व्यापार प्रवक्ते ओलोफ गिल यांनी एका निवेदनात म्हटले आहे.

विश्लेषकांच्या मते, सध्याच्या जागतिक व्यापार तणाव आणि संभाव्य कर युद्धाच्या पार्श्वभूमीवर, दोन्ही बाजूंना वाटाघाटींमध्ये अधिक लवचिक राहण्याची गरज आहे. भारत आणि युरोपियन युनियन अनेक वर्षांपासून व्यापार करारावर चर्चा करत असून, फेब्रुवारीमध्ये दोन्ही देशांनी वर्षाच्या अखेरीस करार अंतिम करण्याच्या दिशेने पावले उचलण्याचे
मान्य केले आहे.

युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा यांनीही गेल्या आठवड्यात सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स ’ वर भारतासोबतच्या वाटाघाटी निर्णायक टप्प्यात पोहोचल्या असून, आता पुढील निर्णय घेण्याची वेळ आली आहे, असे स्पष्ट केले होते.

### घरगुती सिलिंडर ५० रुपयांनी महाग

**नवी दिल्ली, दि. ७ :** पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती वाढल्यानंतर आता सामान्यांना सरकारने आणखी एक झटका दिला आहे. ८ एप्रिलपासून गॅस सिलिंडर १० किंवा २० नाही तर ५० रुपयांनी महाग झाला आहे. सरकारने घरगुती वापरासाठीचा एलपीजी गॅस सिलिंडर ५० रुपये महाग केल्याचं जाहीर केलं आहे. उज्ज्वला गॅस योजनेच्या अंतर्गत ५०३ रुपयांना मिळणारा सिलिंडर आता ५५३ रुपयांना मिळणार आहे तर ही योजना सोडून असलेला एक सिलिंडर ८०३ रुपयांवरुन ८५३ रुपये इतका झाला आहे. ८ एप्रिलपासून ही दरवाढ लागू करण्यात आली आहे.

पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी सांगितले की, आंतरराष्ट्रीय किंमती वाढत आहेत. त्यामुळे ८ एप्रिलपासून एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरांमध्ये ५० रुपयांची वाढ केली जाते आहे. स्वयंपाकाला लागणाऱ्या गॅस सिलिंडरच्या किंमती वाढल्या आहेत असे त्यांनी जाहीर केले आहे. घरगुती गॅस सिलिंडर ५० रुपयांनी महाग झाला आहे.